# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सार्वजनिक बांधकाम विभाग प्रभाग समीती क्र २,

## जाहिर प्रकटन क्रमांक १२ /२०२३-२०२४

जा.क्र./मनपा/प्र.स.क्र.2/ 50 /2023-24 दिनांक :-29 /08/2023.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.2 शासकीय विभागाकडून खुले प्रवर्गातील / सुशिक्षित बेरोजगार अभियंता/मजूर सहकार सोसायटी,नोंदणी प्रमाणपत्र असलेले मक्तेदार खालील नमुद कामांसाठी जाहीर निविदा प्रसिध्द करून दोन लिफाफा पध्दतीनुसार निविदा दर मागविणेत येत आहेत.सदरच्या निविदा प्रभाग समिती क्र.2 चे कार्यालयाच्या बारनिशी विभागामध्ये स्विकारल्या जातील.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय र.रु. | फॉर्म फी र.रु. | कामाची मुदत | वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सांगली वॉर्ड क्र.17 मनपा ओपन स्पेस मधील सि.स.नं.12867 मध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे. | **4,97,735/-** | 750/- | 30 दिवस | 8 वर्ग |

१. संपूर्ण निविदा प्रक्रिया म्हणजेच अर्ज विक्री व सादरीकरण व निविदा स्विकृती प्रभाग समिती क्र .२ चे १०० फुटी रोड पुजारी प्लॉट, विश्रामबाग गणपती मंदिराचे पाठिमागे येथील कार्यालयात कार्यरत राहील.

२. निविदा संचाची विक्री प्रभाग समिती क्र २ चे कार्यालयात अधिकृत नोंदणी केलेल्या ठेकेदारांना प्रसिध्दीच्या दिनांकापासून फॉर्म फी भरलेली पावती सदर केलेनंतर कोरे निविदा फॉर्म साठी लेखी अर्ज दि.08/09/२०२३ रोजी दूपारी 12.00 वाजेपर्यंत सादर करावेत . व दिनांक 11 /09/2023 अखेर कोरे निविदा फॉर्म देणेत येतील व निविदा भरलेले फॉर्म प्रभाग समिती क्र. २ चे कार्यालयात दि.12/09/2023 अखेर दुपारी 3.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

३. प्राप्त निविदा दि 13/09/2023 रोजी दुपारी 12.00 वा. निविदा ओपनिंग कमिटीसमोर उघडण्यात येतील.

४. सदर कामासाठी मक्तेदाराने म.न.पा. निविदा अटी व शर्ती स्वाक्षरी करुन पहिल्या लिफाफ्यासोबत नोंदणी प्रमाणपत्र , व्यवसायकर ना देय प्रमाणपत्र, कामाचे दाखले, अद्यावत जी. एस .टी. प्रमाणपत्र , जोडण्याचे आहेत व लिफाफा क्रमांक २ मध्ये म.न.पा. कडील निविदा फॉर्म स्वहस्ताक्षरी करुन सिल बंद निविदा दर देणेचे आहेत.

५. कोणत्याही निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारण्याचा अधिकार महापालिकेने राखून ठेवलेला आहे.

६. निविदा प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र .२ चे कार्यालयात संपर्क साधावा.

७. सदर कामासाठी बयाणा रक्कम 1% असून सदर बयाणा रक्कम युनियन बँक ऑफ इंडिया, महानगरपालिका खाते क्र. ४२४२०२०१०५०२७०८ या खातेवर भरणेचे आहे.

८. सदर कामास शर्ती अटी टेंडर शर्ती अटी प्रमाणे राहतील.

( पी.एम.हलकुंडे )
नगर अभियंता
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रभाग समिती क्रमांक २,

### निविदा अटी व शर्ती (जाहीर प्रकटन क्रमांक १२ / २३-२४ दि. 29 /08 /२०२३ )

निविदा दोन लिफाफा पध्दतीने देणेचे आहे. (लिफाफ्यावर कामगिरी व लिफाफा क्रमांक स्पष्ट लिहावा)

**लिफाफा नं. १ मध्ये -**

अ) महापालिका नोंदणी वर्ग प्रमाणपत्र /शासन नोंदणी प्रमाणपत्र/ व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र/ उदयोग आधार,जीएसटी प्रमाणपत्र,पॅन कार्ड,कामाचे दाखले.
ब) बयाणा रोखीने भरलेले बँकेचे चलन असणे आवश्यक आहे.
क) निविदेतील विषयांकित कामाबाबत हाती असलेल्या व झालेल्या कामाचे अद्यावत दाखले.
ड) व्यवसायकर ना देय प्रमाणपत्र.
इ) सुशिक्षित बेरोजगार असलेचे प्रमाणपत्र.
फ) आद्यावत जी. एस. टी. प्रमाणत्र.-

**लिफाफा नं. २ मध्ये म.न.पा.** निविदा फॉर्मवर स्वहस्ताक्षरात निविदा दर देणेचा आहे.

**अटी व शर्ती :-**

१ . **वरील सर्व कागदपत्रांची छायांकित प्रत सत्यप्रती म्हणून सक्षम अधिकाऱ्यांकडून स्वाक्षांकित करुन सादर करणेत यावी.**
२ . कोणतीही निविदा मंजूर /ना मंजूर करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.
३ . निविदा फॉर्मच्या अनुषंगाने अंदाजपत्रके / इतर माहितीसाठी मक्तेदार / पुरवठादार यांनी नगर अभियंता,प्रभाग समिती क्रमांक २ यांचेकडून माहिती घेणेची आहे.
४.आलेल्या निविदा दिनांक 13 /09 /२०२३ रोजी सकाळी १२.०० वाजता प्रभाग समिती क्रमांक २ येथील नगर अभियंता यांच्या कक्षामध्ये उघडल्या जातील.
५ . बयाणा रक्कम बँकेचे चलन या स्वरुपात स्विकारली जाईल.
६ . वरील कामासाठी अंदाजपत्रकामध्ये नमुद केलेल्या बांधकाम साहित्याचा साठयाचा पुरवठा ठरवून दिलेल्या वर्णनानुसार / दरानुसार करणे बंधनकारक राहील.
७. इमारत व दळणवळण विभागाचे /कामगार कायदा / रॉयल्टी वगैरे तरतूदी बंधनकारक राहतील.
८ . मक्तेदारांनी महानगरपालिकेच्या कामासाठी मनपा हद्दीबाहेरुन आणलेल्या मालांवर एल.बी.टी. माफी दिली जाणार नाही.
९ . एस्टीमेटमधील प्रत्येक बार्बीच्या एकूण क्वांटीटी अंदाजित आहेत. प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या मापावर बीले केली जातील.
१०.नकाशा व स्पेशिफिकेशन प्रमाणे आणि संबंधीत अभियंता वेळोवेळी करतील त्या सूचना त्या पध्दतीने व तसे सर्व काम अगर कामाचा कोणताही भाग पूरा करणेचा आहे.नकाशे व अंदाजपत्रक व कामाचेखुलासेवार वर्णन यांच्या प्रति मंजूर मक्तेदारास दिल्या जातील.
११.मूळ स्पेसिफिकेशन,ड्रॉईंग्ज,डिझाईन्स या मध्ये काम सुरु झालेनंतर मंजूर कामामध्ये बदल करणेचा किंवा वाढ करण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिकेस राहतील आणि त्याप्रमाणे संबंधीत मक्तेदाराने कार्यवाही ठेवणे बंधनकारक आहे.असे काम करताना मुळ कामाच्या सर्व अटी लागू राहतील.मात्र अशातऱ्हेच्या बदल किंवा वाढ करण्यास संबंधीत विभाग प्रमुख हे आगाऊ लेखी हुकूम देतील.
१२.बदल केलेले किंवा वाढ केलेले काम कॉन्ट्रक्टरने मुळ एस्टिमेट दराप्रमाणेच करणेचे आहे.
१३. बदल केलेले किंवा वाढ केलेले कामाबद्दलचे अॅटम एस्टिमेट मध्ये नसेल तर मा. आयुक्त यांच्या मान्यतेने दर ठरविले जातील असा ठरविलेला दर मंजूर दराने यादीतील असलेले दरापेक्षा जास्त असता कामा नये.मात्र ज्या दराप्रमाणे टेंडर मंजूर झाले आहेत त्या दराने आकारणी करण्यात येईल.
१४. बदल केलेल्या किंवा वाढ केलेल्या कामामुळे दिलेल्या मुळ मुदतीपेक्षा जादा मुदत लागल्यास मा.आयुक्त यांच्या सल्याने मंजूर करणेत येईल.
१५. विशेष प्रसंगी जरुर त्या कारणासाठी काम तात्पपुरते थांबविण्याचा शहर अभियंता यांनी कॉन्ट्रक्टर यास हुकूम केल्यास त्या बद्दल कोणत्याही सबबीवर कॉन्ट्रक्टर यास नुकसानी मागता येणार नाही.
१६. कामास दिलेल्या मुदतीचे प्रमाणामध्ये कामाची प्रगती झालीच पाहिजे व तशी झाली नाही अशी शहर अभियंता यांची खात्री होईल त्यावेळी मा.आयुक्त यांच्या मान्यतेने कॉन्ट्रक्ट रद्द करुन राहिलेल्या कामाबद्दल टेंडर मागवून अगर अन्य रितीने ते काम पुर्ण राहिलेल्या कामाचा जो जादा खर्च येईल तो मुळ कॉन्ट्रक्टर कडून वसुल केला जाईल.
१७.स्पेसिफीकेशन प्रमाणे बांधकाम साहित्य वापरुन काम स्पेसिफिकेशन मधील तरतूदीप्रमाणे पुर्ण झालेले नाही असे शहर अभियंता यांच्या नजरेस आल्यास व शहर अभियंता यांची तशी खात्री झाल्यास कॉन्ट्रक्टर यास नोटीस देऊन स्पेसिफिकेशन प्रमाणे बांधका साहित्य वापरुन स्पेसिफिकेशन मधील पध्दतीप्रमाणे कॉन्ट्रक्टर यास काम करणेस सांगितले जाईल व ते काम कॉन्ट्रक्टर याने केले पाहिजे अशा तऱ्हेच्या निदर्शनास आणण्यापूर्वी कॉन्ट्रक्टरच्या नजरेस ही गोष्ट आणली नाही अशी सबब चालणार नाही. नोटीशी प्रमाणे कॉन्ट्रॅक्टरने काम न केल्यास नापसंत केलेला माल काढून त्याऐवजी योग्य तऱ्हेचा माल वापरुन योग्य पध्दतीने कॉन्ट्रॅक्टरच्या खर्चाने महानगरपालिके कडून पूर्तता केली जाईल.
१८.फायनल बिल होण्यापूर्वी पुराने किंवा अपघाताने किंवा दुसऱ्या कोणत्याही आकस्मिक कारणाने कामाचे जे नुकसान होईल त्याची जबाबदारी मक्तेदारावर राहील व त्या कामाची दुरुस्ती किंवा नव्याने स्वखर्चानेकरणे मक्तेदारावर बंधनकारक राहील

Scanned with OKEN Scanner

१९. कामावर वापरावयाचे बांधकाम साहित्य महानगरपालिकेच्या शहर अभियंता यांनी किंवा त्यांच्या वतीने कोणीही जबाबदार अभियंता यांनी पसंत केल्याशिवाय तो कामात वापरता कामा नये. नापसंत माल २४ तासाच्या आत मक्तेदाराने कामापासून एक फर्लांगाच्या बाहेर नेऊन टाकला पाहिजे. तसे न केल्यास नापसंत माल संबंधित खात्याकडून दुर केला जाईल व त्याला येणारा खर्च मक्तेदाराकडून वसूल केला जाईल.

२०. महानगरपालिकेचे शहर अभियंता किंवा त्यांचे वतीने कोणत्याही जबाबदार अभियंता यांनी पसंत केल्याशिवाय तो भरता कामा नये. तसेच जे काम भिंतीस, जमिनीत किंवा इतर ठिकाणी झाकले जाऊन मागावून त्यांची मापे घेता येणे शक्य नाही अशा तऱ्हेचे असले तर ते झाकण्यापूर्वी मापे घेण्यासाठी मक्तेदाराने चार दिवस अगोदर कळविले पाहिजे.यात हयगय झाल्यास मक्तेदाराने आपल्या स्वखर्चाने झालेले काम उघडे करुन दाखविले पाहीजे.

२१. कोणत्याही कारणासाठी मनपाचे परवानगीशिवाय मक्तेदारास यादीतील काम दुसऱ्यास तबदील करता येणार नाही.

२२. काम चालू असताना मक्तेदाराने अपघात वगैरे टाळण्यासाठी जरुर ते दिवे लावले पाहिजेत.कुंपन केले पाहिजे.योग्य ती काळजी घेतली पाहिजे.यात हयगय झालेस अपघाताने झालेल्या नुकसानीस मक्तेदार जबाबदार राहील.

२३. महापालिकेच्या शहर अभियंता/विभाग प्रमुख यांची परवानगी शिवाय रविवारी काम करता येणार नाही

२४. कामावर वापरणारा कोणताही इसम योग्य रितीने काम करत नाही असे दिसून आल्यास काम बंद केले जाईल.

२५.सर्व प्रकारच्या खणीची फी, जकातीचा कर, जमिन भाडे, रॉयल्टी, सर्व प्रकारचे शासकीय कर वगैरे मक्तेदाराने दिले पाहीजेत.

२६. कॉन्ट्रॅक्टर आपणास नादार ठरवून घेणाचा कोर्टमार्फत अगर अन्य रितीने प्रयत्न करील अथवा आपल्या धनकोशी तथा प्रकारे संगणमत करील असे दिसून आल्यास कॉन्ट्रॅक्टर रद्द केले जाईल.व शर्त नं. १७ प्रमाणे तजवीज केली जाईल.

२७. एखाद्या फर्मच्या भागीदारीची टेंडर दिली असल्यास फर्मच्या घटनेतील कोणताही बदल ताबडतोब कॉन्ट्रॅक्टर याने महापालिकेस कळविले पाहीजेत.

२८. सर्व काम इ.स. १९३१ च्या मुंबई पी.डब्ल्यु. डी. बुकाप्रमाणे तसेच रेड बुकातील स्पेसिफीकेशनप्रमाणे महापालिकेचे शहर अभियंता सांगतील त्याचप्रमाणे करावयाचे आहे.

२९. कामावर एखाद्या इसमास दुखापत किंवा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी मक्तेदारावर राहील.

३०. वर्कमेन कॉम्पेन्सेशंन्स ॲक्टखाली जर महापालिकेवर जबाबदारी बसली तर त्या जबाबदारीची रक्कम कॉन्ट्रॅक्टर कडून वसुल केली जाईल.

३१. दुष्काळी अगर महागाईच्या काळी त्यातील मजुर महानगरपालिकेने सांगितलेस कॉन्ट्रॅक्टरने कामावर लावले पाहिजेत

३२. कामावर लावलेल्या मजुरांची यादी महानगरपालिकेने मागितलेस ती मक्तेदाराने दिली पाहिजे.

३३. कामास आरंभ करण्यास विलंब लागल्यास त्याबद्दल मक्तेदारास मोबदला मिळणार नाही.

३४.महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या मुदतीत काम टप्याटप्याच्या गतीने झाले नाही तर दंडाची आकारणी खालीलप्रमाणे केली जाईल.

अंदाजित रक्कमेपेक्षा रुपये ३,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ५/- (पाच)
रुपये ३,००१/- ते १०,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये १०/- (दहा)
रुपये १०,००१/- ते २५,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ३०/- (तीस)
रुपये २५,००१/- ते १,००,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ५०/- (पन्नास)
रुपये १,००,०००/- ते ५,००,०००/- पर्यंत दर दिवसास रुपये ३००/- (तीनशे)
रुपये पाच लाखापेक्षा अधिक रक्कमेच्या कामास दर दिवसास रुपये ५००/- (पाचशे) मात्र दंडाची आकारणी करणेत येईल व ती रक्कम बिलातून कापून घेतली जाईल.

३५.मनिमम वेजेस ॲक्ट प्रमाणे कायद्याने जबाबदारी मक्तेदारावर राहील.त्यास महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

३६. कोणत्याही कामास्तव ॲडव्हॉन्स दिला जाणार नाही.

३७.ज्याचे टेंडर मंजूर करण्यात येईल त्याला टेंडर मंजूर झाल्याची पहिली समज दिल्या पासून सात दिवसाचे आत किंवा दुसरी अंतिम समज चार दिवसांचे मुदतीची दिल्यापासून एस्टीमेट रक्कमेवर २.५% प्रमाणे होणारी सुरक्षा अनामत म्हणून महानगर पालिकेच्या लेखा विभागाकडे (मुख्यालय) रोखीने /बँकेकडील खाते क्रमांक ४२० वर भरली पाहिजे आणि योग्य स्टॅम्प सांगली हद्दीत लायसेन्स जामिनासह करारपत्र पुरे करुन दिले पाहिजे.२.५% सुरक्षा अनामत रनिंग बीलातून वसुल केली जाईल.मक्तेदाराकडून तसे मुदतीत न झालेस टेंडर बयाणा खास जमा करणेत येईल व मक्तेदाराचे नांव कॉन्ट्रॅक्टर नोंदणीकृत नोंद वही मधून कमी केले जाईल.

३८. टेंडर दिलेनंतर त्याबाबत कसलीही खुलासा किंवा सबब ऐकली जाणार नाही व त्याचा विचारही केला जाणार नाही.

३९. कॉन्ट्रॅक्टरने घेतलेले काम पूर्ण झाल्याबरोबर त्याच दिवशी संबंधीत खात्याकडे कळविणेचे आहे.कामाचे फायनल बिल रेकॉर्ड करुन घेणेची जबाबदारी मक्तेदारंची आहे.

४०. टेंडर मधील करावयाचे दर शब्दात,आकडयात दिले पाहिजेत.अटी नमुद केलेल्या सही नसलेली अगर नियमास अनुसरुन नसलेले टेंडर विचारात ठेवले जाणार नाहीत.

४१. सदरचे काम करताना मक्तेदार यांनी कामगिरी सुरु असताना टेलिफोन केबल्स,पाईप लाईन व इत्यादीस नुकसान झालेस त्याची संपुर्ण जबाबदारी आपणांवर राहील व होणारे नुकसान आपण स्वत:भरणेचे आहे.

४२. रॉयल्टी बाबत शासनाने वेळोवळी निर्देशीत केलेप्रमाणे रॉयल्टी भरणे कंत्राटदारास बंधनकारक आहे.त्याबाबत कोणतीही सवलत देय नाही. (रॉयल्टी भरलेबाबतचा योग्य तो पुरावा कार्यालयाकडे सादर करणे गरजेचे आहे.)

४३. शासनाच्या नियमाप्रमाणे व शासनाच्या बांधकाम विभागाकडील दरसुची मध्ये नमुद केलेनुसार लेबर वेलफेअर सेस व कॉन्ट्रेक्ट वर्क इन्सुरन्सबाबत प्रत्येक कामावेळी कार्यवाही ठेवणे आवश्यक आहे.

४४. शासन निर्णयानुसार सदर कामगिरीसाठी अंदाजित रक्कमेच्या १% रक्कम शासकीय विमा निधीकडे भरणे आवश्यक आहे. अन्यथा सदर रक्कम बिलातून कपात करण्यात येईल.

४५. डांबरी रस्त्याची कामे काम पूर्ण झाले तारखेपासून किमान तीन वर्षे अथवा डीएलपी पिरीयड नमूद केलेप्रमाणे चांगल्या स्थितीत जागेवर टिकून राहणे आवश्यक आहे.न राहीलेस मक्तेदाराने स्वखर्चाने उक्त रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने करुन देणेचे आहे.

Scanned with OKEN Scanner

४६. उक्त निविदे प्रक्रियेमधील सर्वात कमी दराच्या निविदाधारकाचा दर हा अंदाजपत्रकीय दराच्या किमतीपेक्षा १०%पेक्षा कमी असेल तर सदर निविदा धारकाने दर कमी भरलेबाबतचा लेखी खुलासा मनपास देणेत यावा.

४७. सुरक्षा अनामत रक्कम डिफेक्ट लॉयबलिटी कालावधी पूर्ण झालेनंतर कामाची स्थितीयोग्य असल्याचे खातरजमा सक्षम त्याकडून होऊन प्रमाणित केलेनंतर अदा करणेत येईल.

४८. परफॉरमन्स सिक्युरिटी डिपॉझीट-

a ] परफॉरमन्स सिक्युरिटी डिपॉझीट रक्कम खालीलप्रमाणे राहील-

i. निविदा भरले निविदाधारकाचा दर हा अंदाजपत्रकीय दराच्या किमतीपेक्षा १०% पर्यंत कमी असेल तर सदर निविदा धारकाने निविदाधीन किमतीचे १% तसेच

ii. निविदा भरले निविदाधारकाचा दर हा अंदाजपत्रकीय दराच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर अंदाजपत्रकीय दराच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जेवढया दराने कमी आहे तेवढी रक्कम व बाब क्र. i. प्रमाणे येणारी रक्कम मिळून एकुण रक्कम राहील [ उदा= १४% कमी दर- १०% पर्यंत करिता १% व [ १४% - १०% ]-४% मिळून एकूण [ १% + ४% ] - ५%]

iii. दिनांक २६/११/२०१८ च्या शासन निर्णयानुसार निविदेचा दर १५ % पेक्षा जास्त कमी असल्यास उर्वरीत रक्कमेसाठी २ पटीने रक्कम डी.डी. व्दारे सादर करणे अनिवार्य राहील.

उदा. १९% कमी दरासाठी खालीप्रमाणे पृथ:करण -

१० % कमी दरापर्यंत १% व १५ % कमी दरापर्यंत (१५% - १०%) = ५% तसेच (१९-१५) = ४% करीता (४x२) = ८ %असे एकूण (१+५+८)=१४%

b] परफॉरमन्स सिक्युरिटी डिपॉझीट रक्कम आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका यांचे नांवे डी.डी. [धनाकर्ष]च्या स्वरुपात देणेची आहे.

c] महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/ इमा-२, दि. २६/११/२०१८ नुसार सदर पर फॉरमन्स सिक्युरिटी डिपॉझीटची रक्कमेचा डी.डी. लिफाफा क्र. २ सोबत स्कॅन करुन सादर करणे ही अट रद्द करणेत आली आहे. त्या ऐवजी सदर मुळ डी.डी.निविदेचा लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र. २ उघडल्यानंतर प्रथत न्युनतम देकार सादर करणाऱ्या L-१निविदा धारकाने आठ दिवसाच्या आत नगर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग, मिरज यांचे कार्यालयात लखोटयामध्ये जाहीर प्रकटन/वर्ष, कामाचे नाव व अ.क्र नमुद करून देणेचा आहे.

c] सदरचा मूळ डी.डी.[धनाकर्ष] नगर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रभाग समिती क्र. २,सांगली यांचे कार्यालयात सीलबंद लखोटयामध्ये जाहीर प्रकटन क्रमांक/वर्ष,कामाचे नाव व अ.क्र. नमुद करुन निविदा भरलेच्या तारखेनंतर दोन दिवसात देणेचा आहे.

d] सदर डी.डी. [धनाकर्ष] उक्तप्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झाला नाही तसेच डी.डी. [धनाकर्ष] मधील नमुद रक्कम मुद्दा क्र. a मध्ये नमुद केलेनुसार नसेल तर सदर निविदाधारकाची निविदा पुढील मंजुरीसाठी ग्राह्य धरणेत येणार नाही व त्यास अपात्र ठरविणेत येईल.

e] सदर डी.डी.(धनाकर्ष)ची मुदत निविदा भरणे तारखेपासून ३(तीन) महिन्यापर्यंत राहील.सदर डी.डी.वर बँकेचा MIRC व IFC कोड नंबर असणे आवश्यक आहे.

f ] निविदाधारकांची सदर निवीदेच्या अनुषंगाने जमा केलेली कागदपत्रे / डी.डी. [धनाकर्ष] खोटी असलले आढळून आलेस सदर निविदाधारकांची बयाणा रक्कम (EMD) जप्त करुन घेणेत येईल व त्याची नोंदणी १ (एक) वर्षासाठी निलंबीत करणेत येईल. तसेच या व्यतिरिक्त कायद्यानुसार इतर कायदेशीर कार्यवाही करणेत येईल.

g] मंजूर मक्तेदारास डी.डी. [धनाकर्ष] बाबत पूर्ण शहानिशा डी.डी. [धनाकर्ष](Clearence व इतर बाबी) झालेनंतरच कार्यारंभ आदेश देणेत यईल.

h] काम समाधानकारकपणे पूर्ण झाल्यावर निवीदेतील तरतुदीप्रमाणे सदरचा डी.डी.(धनाकर्ष) रक्कम मंजुर निविदाधारकास तीन महिन्याच्या आत देणेत येईल.

४९.ज्याचे टेंडर मंजूर करण्यात येईल त्याला टेंडर मंजूर झाल्याची पहिली समज दिल्यापासून सात दिवसाचे आत किंवा दुसरी अंतिम समज चार दिवसाचे मुदतीची दिल्यापासून एस्टीमेट रक्कमेवर २.५% प्रमाणे होणारी सुरक्षा अनामत रक्कम युनियन बँक ऑफ इंडिया बँकेत मनपाचे खात्यावरील खाते क्र.४२४२०२०१०५०२७०८वर RTGS ने भरणेचे आहे.आणि योग्य स्टॅम्प सांगली हद्दीत लायसेन्स ाामिनासह करारपत्र पुरे करुन दिले पाहिजे.२.५ % सुरक्षा अनामत रक्कम प्रत्येक रनिंग बिलातून वसुल केली जाईल.

५०. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.जी.एस.टी./प्र.क्र.८१/कराधान-१,दिनांक १९/०८/२०१७ यामधील नमुद मार्गदर्शक सुचनानुसार जी.एस. टी. ची अंमलबजावणी दि.१ जुलै २०१७ पासून सुरू केलेने जी.एस.टी.अधिनियमानुसार कराची आकारणी होणार असलेने त्याबाबत जी.एस.टी.च्या कराच्या बोज्याचा विचार करुन निविदा दर भरुन सादर करणेचा आहे.तसचे त्या जी.एस.टी. बाबत शासनाकडून वेळोवळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार व जी.एस.टी.नोंदणी प्रमाणपत्र निविदेत सादर करणे आवश्यक आहे. दि.१८/०८/२०१७ चे शासन परिपत्रक व त्यापुढील वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार आवश्यक सर्व कार्यवाही मक्तेदारांवर बंधनकारक राहील.

५१. सदर अटी व शर्ती मध्ये सुधारणा करणे,अटी शर्ती वाढविणे /कमी करणेचा अधिकार मा.आयुक्तांना राहील.

५२. सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना सर्व कामांसाठी बयाणा रक्कम माफ आहे.

५३. उक्त निवीदेमधील मंजूर मक्तेदार यांनी देयक सादर करतेवेळी तांत्रिक लेखापरिक्षण अहवाल (थर्ड पार्टी इन्स्पेक्शन) सादर करणेचा आहे.त्यासाठी लागणारी अनुषंगिक फी ही संबंधीत कामाचे मक्तेदारयांनी अदा करणेची अहे. या कामी मनपाकडून संबंधीत संस्थेस थर्ड पार्टी इन्स्पेक्शन बाबत पत्र दिले जाईल.या विषयी सर्व खर्च मक्तेदार यांनी करावयाचा आहे.

५४.सदर कामगिरीसाठी कामाचे मंजूर मक्तेदार यांनी त्यांचेकडे असलेल्या कामगारांचा भविष्य निर्वाह निधी (EPF)स्वत: भरणेचा आहे. तसेच त्याची सर्व कागदपत्रे देयकासोबत या कार्यालयाकडे सादर करणेचे आहे.

५५.सदर कामाचे माहितीचा फलक कामाचे ठिकाणी काम सुरु करण्यापूर्वी मंजूर ठेकेदाराने स्वखर्चाने उभा करावयाचा आहे व फलक नगर अभियंता व शहर अभियंता यांचे आदेशा ़सार माहिती घेऊन उभा करणेचा आहे.

५६. सहा. मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, महाराष्ट्र शासन नागपूर यांचेकडील परिपत्रक क्र.का.३(२)/निवीदा /५८८०/२०१८, दि.९/७/२०१८ नुसार सदर निविदेसुचनेमधील एकाच कंत्राटदारास तीनपेक्षा जास्त कामे देण्यात येणार नाहीत.सबब त्यानुसार निविदा भरतेवेळी कंत्राटदाराने या बाबत दक्षता घेणेची आहे.

Scanned with OKEN Scanner

५७. शासनाकडून वेळोवेळी प्रसिध्द होणारे शासन निर्णय व परिपत्रक / आदेश या निविदेमधील कामांना लागू करणेची अधिकार मा.आयुक्त सो यांना राहतील.

५८. सदर कामास शर्ती अटी टेंडर शर्ती अटी प्रमाणे राहतील.

५९. कोणतीही एक निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचा अधिकार महापालिकेने राखून ठेवले आहे.

६०.काम नं.१ साठी - व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र / उदयोग आधार ,जीएसटी प्रमाणपत्र,पॅन कार्ड,कामाचे दाखले.आधार का असणे कामाचे दाखले असणे बंधनकारक राहिल.

( पी.एम.हलकुडे )
नगर अभियंता
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner